दिनांक 15.04.2025

# प्रेस नोट

## नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाच्या वेबसाईटचे कुलगुरू श्री मनोहर चासकर यांचे हस्ते उद्घाटन

नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाच्या वेबसाईटचे उद्घाटन आज स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू श्री मनोहर चासकर यांचे शुभ हस्ते पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयात संपन्न झाले. याचबरोबर, परिक्षेत्रातील विविध पोलीस ठाण्यात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांच्या तपासावर निगराणी ठेवण्यासाठी 'ईगल आय : क्राईम इन्वेस्टीगेशन मॉनिटरिंग' व कार्यालयीन टपालाचा जलद निपटारा व्हावा म्हणून संपूर्ण परिक्षेत्रासाठी ' ई-टपाल सेवा' या प्रणाली देखील श्री चासकर यांचे शुभ हस्ते कार्यान्वित करण्यात आल्या.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सर्व शासकीय कार्यालयांना १०० दिवसांचा सात कलमी कृती कार्यक्रम आखून दिला आहे. यास अनुसरून, विविध पातळीवर कार्यालयीन सुधारणांचे व नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांचे आधुनिकीकरण सुरू आहे. सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने परिक्षेत्रीय कार्यालयामार्फत सुरु करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक, श्री शहाजी उमाप यांनी दिली.

नांदेड परिक्षेत्राच्या स्थापनेपासून, या कार्यालयास स्वतंत्र अशी **वेबसाईट** नव्हती. किनवट येथील Settribe Ed_tech Prudentia यांनी **nandedrange.mahapolice.gov.in** ही वेबसाईट परिक्षेत्र कार्यालयासाठी तयार करून दिली आहे. सदर वेबसाईटमुळे, नांदेड परिक्षेत्रातील नागरिकांना पोलीस कामकाजाशी निगडित विविध माहिती अचूक व जलद गतीने मिळणार आहे. त्याचबरोबर, सदर वेबसाईटवरून नागरिकांना आपल्या तक्रारी मांडण्याची व गोपनीय माहिती पोलीसांना पुरविण्याची देखील व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.

'गुन्हे तपास' हे पोलीसांच्या अनेक कामापैकी एक अतिशय महत्त्वाचे कामकाज आहे. पोलीस ठाणे पातळीवर दाखल होणाऱ्या गुन्ह्यांच्या तपासावर वरिष्ठ अधिकाऱ्यांची दैनंदिन निगराणी राहावी, या दृष्टिकोनातून **Eagle Eye : crime investigation monitoring** ही प्रणाली देखील नाशिक येथील mind software IT consultancy यांचे मार्फत विकसित करण्यात आली आहे. परिक्षेत्रातील सर्व 91 पोलीस ठाण्यात दाखल होणाऱ्या प्रकरणांची माहिती सदर प्रणालीत भरल्यामुळे, गुन्हे तपासाच्या प्रत्येक टप्प्यावर निगराणी ठेवणे पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांना सुकर होणार आहे.

उपरोक्त व्यवस्थेसोबतच, नांदेड परिक्षेत्रात **ई-टपाल प्रणाली** देखील कार्यान्वित करण्यात आली आहे. आजपर्यंत पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय व पोलीस अधीक्षक कार्यालये ही ई- टपाल व्यवस्थेने जोडण्यात आली होती. मात्र, परिक्षेत्रातील अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी यांची कार्यालये व पोलीस ठाण्यांचे पातळीवर अशी प्रणाली उपलब्ध नव्हती. वर्धा येथील Grace infosoft pvt ltd यांनी सदर कार्यप्रणाली नांदेड परिक्षेत्रासाठी उपलब्ध करून दिली असून, यामुळे परिक्षेत्रातील सर्व 91 पोलीस ठाणे व इतर क्षेत्रीय कार्यालये ऑनलाइन टपाल व्यवस्थेने जोडली जाणार असून त्यामुळे वेळेत व खर्चात मोठी बचत होणार आहे.

आज पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयात संपन्न झालेल्या समारंभात, नांदेडचे पोलीस अधीक्षक श्री अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक श्री सुरज गुरव, उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती अश्विनी जगताप यांचेसह इतर पोलीस अधिकारी व अंमलदार हजर होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक श्री संतोष देवराये यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री दशरथ तलेदवार यांनी केले.

कार्यालय पोलीस उप महानिरीक्षक,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड